# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६–२००७)

कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई – ४०० ०३३.


जा. क्र. : १९/२०१७-१८ दिनांक : ०६/०५/२०१७

प्रति,

**मा. अध्यक्ष / सचिव,**

अभ्युदयनगर ______________ सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या.),

इमारत क्र. ........., अभ्युदयनगर,

काळाचौकी, मुंबई - ४०० ०३३.

**विषय : <u>आपल्या संस्थेच्या पुनर्विकास योजनेकरीता विकासक निवडीच्या सर्वसाधारण सभेस प्राधिकृत अधिकारी नियुक्तीबाबत.</u>**

**संदर्भ : उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे पत्र क्र. उपनि/ससं/ससं/मुशकोन/बी-१/१५/२०१७ दिनांक १३.०२.२०१७.**

**महोदय,**

उपरोक्त विषय व संदर्भान्वये आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी आपल्या संस्थेच्या पुनर्विकास योजनेस विकासक निवडीच्या सर्वसाधारण सभेस प्राधिकृत अधिकाऱ्याची नेमणूक केलेली होती. परंतु विहित वेळेत संस्थेने विकासक निवडीच्या प्रक्रियेकरीता संस्थेची सर्वसाधारण सभा आयोजित न केल्यामुळे, संदर्भाधीन पत्रान्वये आपल्या संस्थेसाठी केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याची केलेली नेमणूक रद्द केलेली आहे व त्याची प्रत संघास उपनिबंधक सहकारी संस्था मुंबई यांचेकडून प्राप्त झाली आहे व त्यांची नोंद संघाने दफ्तरी घेतलेली आहे.

आपणांस ज्ञात आहेच की, आपल्या संस्थेने केलेला एकत्रित पुनर्विकासाचा ठराव व निविदेस दिलेल्या मंजूरीनुसार ४७ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सहकार्याने कलम ७९ अ अन्वये संघाने अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची प्रक्रिया सुरु केलेली आहे.

पान नं. २ वर....

अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाच्या प्रक्रियेकरिता काढलेल्या निविदेतील अटी व शर्तीनुसार बहुसंख्य सहकारी गृहनिर्माण संस्था अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता ज्या विकासकाची निवड करतील त्यास निविदा बहाल करण्यात यावी व या अटी व शर्तीस आपल्या संस्थेने मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार बहुसंख्य म्हणजे २६ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाकरिता विकासक म्हणून मे. किस्टोन रिअॅल्टर्स प्रा.लि. यांची निवड केल्यामुळे व निविदेतील अटी व शर्तीनुसार संघाने अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची निविदा मे.किस्टोन रिअॅल्टर्स प्रा.लि. यांना बहाल केलेली आहे.

अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकास प्रक्रियेमध्ये आपलीही गृहनिर्माण संस्था एक घटक संस्था आहे, तरी आपणांस विनंती करण्यात येते की, ही बाब आपल्या संस्थेच्या सभासदांच्या निदर्शनास आणून द्यावी व अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकास प्रक्रियेमध्ये समाविष्ट होऊन सहकार्य करावे ही विनंती. अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासासंबंधी काहीही माहिती आवश्यक असल्यास आपण संघाच्या कार्यालयातून सायंकाळी ७.०० ते रात्रौ ९.०० या कालावधीत उपलब्ध करुन घेऊ शकता.

आपला विश्वासू,

सोबत : संदर्भाधीन पत्राची प्रत.

( जयसिंग शि. भोसले )
सरचिटणीस

नोंदणी क्र. एमयुएस/एमएच/एडीबी / एचएसजी / टी.सी) १२४९२ / सन २००६-०७ मुंबई-३३.